**वाचा :-**

१. केंद्र शासनाच्या पर्यावरण व वने मंत्रालय यांचेकडील कार्यालयीन ज्ञापन क्र. No 11-83/2005 IA- III-( Vol. III ) दि. ०८/११/२०११
२. शासनाकडील परिपत्रक क्र.संकीर्ण-०२/२०११/प्र.क्र.१३/ई-१ दिनांक २९/०३/२०१२
३. शासन, महसुल व वनविभाग यांचेकडील निर्णय क्र.गौखनि-१०/०५१२/प्र.क्र.३००/ख दि.१२/३/१३
४. मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल असलेल्या जनहित याचिका क्र. २१/२०१३ संदर्भात सिव्हील ॲप्लीकेशन क्र. ६७/२०१३ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक १९/०३/२०१३ रोजी दिलेला निर्णय.
५. शासन महसुल व वनविभाग यांचेकडील पत्र क्र.गौखनि-२८/०२१३/प्र.क्र.१०१/ख दि.२२/०३/२०१३

---

क्र.रेतीगट/गौख/टे-२/कावि- /१३
जिल्हाधिकारी ठाणे यांचे कार्यालय
**दिनांक :- /०३/२०१३**

**आदेश**

मा. उच्च न्यायालयात दाखल असलेल्या जनहित याचिका क्र. २१/२०१३ प्रकरणी दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशन क्र. ६७/२०१३ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. १९/०३/२०१३ रोजी निर्णय दिलेला असून त्यामध्ये हातपाटी/डूबी पध्दतीच्या पारंपारीक मानवी पध्दतीने रेती उत्खननासाठी परवाने देणेसंदर्भात यापुर्वी दि. २६/०२/२०१३ रोजी दिलेला निर्णय हा संपुर्ण जिल्हयासाठी लागू असल्याचे नमुद केलेले आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडील कार्यालयीन ज्ञापन दि. ०८/११/२०११ नुसार देशातील विविध तटीय राज्यामध्ये मनुष्यबळाने, पारंपारीक पध्दतीने रेती उत्खनन करणा-या संस्थाना रेती उत्खननासाठी तटीय विनियमन क्षेत्र (सीआरझेड) अधिसूचना २०११ मधील तरतुदीत अटी/शर्ती घालून दिलेल्या आहेत.

सदरचे ज्ञापनामधील परिच्छेद ३ (अ) मध्ये रेती उत्खननाचा मनुष्यबळाने, पारंपारीक व्यवसाय करणाऱ्यांना परवाना देणेबाबत जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती नेमण्याची आहे. त्या समिती मध्ये संबंधित विभागाचा किमान एक प्रतिनिधी ज्यामध्ये एक शास्त्रीय किंवा तांत्रिक संस्थेचा प्रतिनिधी, स्थानिक मच्छिमार आणि स्थानिक नागरी संस्था या सारख्या स्थानिक प्रतिनिधी यांचा समावेश करण्याचा आहे.

मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील दि. २६/०२/२०१३ व दि. १९/०३/२०१३ चे आदेश आणि केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाचे कार्यालयीन ज्ञापन दि. ०८/११/२०११ नुसार ठाणे जिल्हयातील डुबी/हातपाटी यासारख्या पारंपारिक पध्दतीने वाळू/ रेती उत्खननासाठी चिन्हांकित केलेल्या व विनालिलाव परवान्यासाठी राखीव असलेल्या खाडीपात्रातील रेतीगटात Manual Method ने पारंपारीक व्यवसाय करणा-या स्थानिक/ संस्थेला परवाना देण्याकामी या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली डुबी **हातपाटीद्वारे रेती उत्खनन परवाना मंजुरी समिती** गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभाग | पदनाम |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी ठाणे | अध्यक्ष |
| २ | अप्पर जिल्हाधिकारी ठाणे | सदस्य |
| ३ | निवासी उपजिल्हाधिकारी ठाणे | सदस्य |
| ४ | जल आलेखक महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड | सदस्य |
| ५ | सहा. आयुक्त, मत्स्य व्यवसाय ठाणे | सदस्य |
| ६ | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ ठाणे/ कल्याण/ पालघर | सदस्य |
| ७ | वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | सदस्य |
| ८ | जिल्हा खनिकर्म अधिकारी, ठाणे | सदस्य सचिव |
| ९ | जयभवानी रेती उत्पादक सहकारी संस्था मर्या. नारिंगी | सदस्य (स्थानिक नागरी संस्था प्रतिनिधी ) |

उपरोक्त समिती केंद्रशासनाच्या दि.०८/११/२०११ च्या ज्ञापनामधील मार्गदर्शक सुचनेनुसार काम करेल. सोबत त्याची प्रत जोडली आहे.

**जिल्हाधिकारी ठाणे**

**प्रत :-**

१. मा.अप्पर मुख्य सचिव, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर
२. मा. सचिव,पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.
३. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.
४. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडे माहितीसाठी सादर.
५. मा.जिल्हाधिकारी,ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.
६. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.
७. जल आलेखक, महाराष्ट्र मेरी टाईम बोर्ड, गोविंद पाटील मार्ग, खारदांडा,खार (प) मुंबई-४०० ०५२.
८. उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, ठाणे, कल्याण, पालघर
९. सहा. आयुक्त, मत्स्य व्यवसाय, ठाणे
१०.वरिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, ठाणे.
११. उपविभागीय अधिकारी (सर्व) यांचेकडे माहितीसाठी रवाना.
१२. तहसिलदार (सर्व) यांचेकडे माहितीसाठी रवाना.
१३. गट विकास अधिकारी- -------------------- यांचेकडे माहितीसाठी रवाना.
१४. जिल्हा खनिकर्म अधिकारी, ठाणे
१५. जयभवानी रेती उत्पादक सहकारी संस्था मर्या. नारिंगी यांना माहितीसाठी.

**जिल्हाधिकारी ठाणे**